The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत तुकारामांच्या अभंगातील परिवर्तनवादी जाणीव

**डॉ. नारायण शिवशेट्टे**
मराठी विभाग, पानसरे महाविद्यालय अर्जापूर ता.बिलोली जि.नांदेड

परिवर्तनशील कवितेमध्ये समाजातील वास्तवतेचे प्रतिबिंब आणि सामाजिक परिस्थितीची निक्रिया हे परिवर्तनवादी काव्याची निर्मिती आहे. ज्यामध्ये काळ आणि समाजातील पूर्ण चित्रण साक्ष देऊन प्रगतिशील साहित्याला सर्वाधीक जाग्रत साहित्याच्या रुपात प्रविष्ट होतो. परिवर्तनशील कवितेमध्ये ओकजीवनाचा आवाज एक अशी घटना सिध्द होते. ज्यामध्ये प्रथमतः कवी किंवा लेखक पृथ्वीवर उभा राहून पूर्ण विश्व कल्याणाचा विचार करतो. गती हे जीवनाचे प्रतिक आहे. आणि प्रवाह खंडित मृत्यू आहे. प्रत्येक पाहित्यिक परिवर्तनशील आसतो कारण तो आपल्या साहित्याद्वारे एक नवा संदेश आणि एक नवी संवेदना नबी समाजाला देऊ इच्छितो. अध:पतित झालेल्या समाजाला जीवनाच्या नवक्षितिजाकडे वाटचाल करण्यासाठी प्रवृत्त करणाऱ्या विचार प्रवाहाला परिवर्तनवादी साहित्य म्हणतात ज्यात समाज कल्याणाचा डेचार, विश्वकल्याणाचा विचार केलेला असतो. वसुदैव कुटूंबकम ही संकल्पना पूर्णत्त्वास येते. संतहृदय र विश्ववंदे जगदगुरु तुकाराम महाराज हे काळाच्या कालचक्रावर मात करुन अदभूत वर्तविणारे क्रांतिकारी अलौकिक संत होय. आजपावेतो या विश्वामध्ये अनेक पंडित, अनेक वैदिक, अनेक दशग्रंथी, अनेक श्वर थोर थोर जन्माला आले पण ते कोणीही हे मृत्यु लोकातील कलेवर नेऊ शकले नाही पण तेच कलेवर मृत्यु लोकांचा नियम पाहून आलेल्या भगवंता बरोबर वैकुंठास नेणारे असे थोर संत म्हणजे जगतगुरु तुकोबा राय होय.

भक्ती, ज्ञान, वैराग्य, धर्म, नीती, व्यवहार सामाजिक गुण दोष इत्यादी महत्त्वाच्या मूल्यांचे प्रबोधन तुकोबारायानी आपल्या अभंगातून केले आहे. ते ही श्री राजगुरुंने सुलभतेने समाजासमोर मांडले आहे. म्हणून आजच्या विक्राळ कलीच्या कालचक्रात परिभ्रमण करणाऱ्या या जगात जी मानवता एकता अखंडता, सेवानिष्ठता, सर्वधर्मपरायणता दिसून येते ती संत वाड्:मयाच्या प्रभावामुळे होय त्या संत वाङ्मयात स्वतेजाने सर्वांचे डोळे दिपवणारी दैदिप्यमान तेजोमय हिरा म्हणजेच श्री तुकोबारायाची अभंगगाथा होय. परमार्थाची वाटचाल करतांना जे अनुभव आले ते तुकारांमानी अभंगामध्ये शब्दबध्द केले आहे. अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी

सर्वसामान्याना आणि स्त्री शुद्रांना भवसागर तरुन जाण्यास भक्ती हा एकच सोपा उपाय आहे. परंतु भक्ती ही म्हणावी तितकी सोपी गोष्ट नसून सुळावरील पोळी आहे. असे ते बजावितात. भक्ती ही त्यांनी स्वतंत्र्य जीवनानिष्ठा मानली सामाजिक जागृतीसाठी आणि

भक्तीचा प्रसार करण्यासाठी तुकोबांना कीर्तनसंस्थाआधिक उपयुक्त वाटते. समाजातील ढोंगीपनावर तुकोबाने प्रखड शब्दांनी प्रहार केला आहे.

देवावरी विंचू आला देवपूजा नावडे त्याला ||
तेथे पैजारेचे काम अधमासी तो अधम ||

हा जैशास तैसा न्याय सांगून दया तीचे नाव भूताचे पाळन आणिक निर्दाळन कटकाचे अशी डोळस भक्ती आणि सामाजिक नीती तुकोबांनी सांगितली आहे. प्रा.वा. ल. कुलकर्णी म्हणतात की वाणी म्हणजे तुकारामाच्या व्यक्तिमत्त्वाचा विमुक्त अविष्कार आहे. तुकारामाची अभिव्यक्ती ही नेहमीच दिलखुलास असते तिच्यात एक प्रकारचा बेछुट विमुक्तपणा असतो. खुरटेपणा तिला ठाऊक नाही. त्यातील भावानुभव हेही रसरसलेले असतात त्यात सजीवता व सामर्थ्य असते. जीवनाची निशाणी सोबत घेऊन येतांना दिसतात.

आम्हा घर धन शब्दाचीच रत्ने |
शब्दांचीच शस्त्रे यत्न करु ||

यासारख्या अभंगातून तुकोबांनी शब्दा हाच आपला देव मानलेला दिसतो.

संत तुकारामांनी आपल्या अभंगातुन धर्म सहिष्णूतेचा विचार आग्रहाने प्रतिपादन केलेले आहे. सर्व जग विष्णूने भरलेले आहे. असे जाणने वैष्णवाचा धर्म आहे. भेदभाव करणे जातिभेद करणे अमंगल आहे देव मनुष्याची उच्च नीच्च जात पात पाहत नसून देव भक्तीभावाचा भुकेला आहे.

यातायाती धर्म नाही विष्णूदास |
निर्णयहा ऐसा वेदशास्त्री ||

तुकोबारायाचा वैज्ञानिक दृष्टिकोन त्यांच्या अभंगातुन व्यक्त होतो.

नवसे कन्या पुत्र होती |
तरी का करणे लागे पती ||

तुकोबारायांनी परधन आणि पर स्त्री यांच्याविषयी वाईट इच्छा बाळगू नका या अभिलाषाने अधोगती होऊन नरकात जावे लागते. त्यामुळे आयुष्याचा नाश होतो पर स्त्री मातेसमान माना असा संदेश त्यांनी दिला.

इतुले करी भलत्या परी परद्रय परनारी ||
सोडूनी अभिलाष अंतरी वर्ते व्यवहारी सुखरुप ||

बौध्दिक पात्रता असतांनाही आपणास वेदाधिकार नाही. ही गोष्ट तुकारामाच्या अंतकरणाला लागुन राहिल्याचे दिसते. वेदविद्येचा न्यूनगंड त्यांच्या वाङ्‌मयात निरनिराळ्या स्वरुपात डोकावतो ज्यावेळी त्यांची विषमतेबद्दल ची अनावर झाली त्या त्या वेळी त्यांनी रुढ कल्पनांचे

वाभाडे काढण्याचे कमी केले नाही. सर्वसामान्य संकेत आणि स्वतंत्र्य प्रेरणा यांच्या तुकारामाचे सर्वस्व आहे. असे वर्णन प्रा. गं. बा. सरदार करतात.

वेदांचा तो अर्थ आम्हासिच ठावा
यरांनी व्हावा भार माथा

परितर्वनवादी विचार मांडतांना त्यांनी समाजातील दांभिकतेवर, अंधश्रध्देवर, अस्पृश्यतेवर, प्रखड शब्दात हल्ला चढवला हयमुळेच अभंगाला क्रांती प्राप्त झाली. संत तुकाराम महाराजांच्या कवितेला अनुभूतीचे व वास्तवाचे सामर्थ्य लाभल्यामुळे ती जिवंत वाटते. प्रत्येक कालखंडामध्ये मानवी समाजात काही अमानवी वृत्ती मानवी जीवनाच्या प्रगतीला व सुखाला अडसर ठरत असतात. संत तुकारामांच्याही कालखंडात समाजात अत्यंत विदारक अशी परिस्थिती निर्माण झाली होती. लोक व्यसनात बुडाले होते. कर्मकांड, अंधश्रध्दा, बुवाबाजी, भोंदूगिरी, चोरी, हिंसा आणि दैववादाला ऊत आला होता. हे पाहून तुकारामांच्या संवेदनशील मनाला वेदना झाल्या व त्यातून त्यांची कविता उदयाला आली.

बुडती हे जन देखवे ना डोळा |
म्हणून येतो कळवळा ||

या काव्यपंक्तीमधून संत तुकारामाची सामाजिक तळमळ व्यक्त होते. त्यांची ही कविता स्वाभाविक आणि अतःकरणाच्या उमाळ्यातून आली आहे. मानवी समाजाची प्रगती त्यांना अपेक्षित होती. आपल्या काळातील सामाजिक अधोगतीला काही समाजकंटक कारणीभूत असून ते अमानुषतेने वागतात. त्यांना हे पाहून त्यांचे मन तळमळत होते. माणुसकी हाच सर्वश्रेष्ठ धर्म आहे, पण ही माणुसकीच संपुष्टात आल्यामुळे समाजात अंदाधुंदी निर्माण झाली होती अशा अमानुषतेने वागणाऱ्या माणसाला

तुका म्हणे ऐशा नरा |
मोजून माराव्या पैजारा ||

अशा अत्यंत परखड शब्दामध्ये शिक्षा ठोठावली होती. ते केवळ संत नव्हते तर समाजशिक्षकही होते. म्हणूनच त्यांची भूमिकाही समाजसुधारकांचीही होती. हीच भूमिका त्यांच्या अभंगातून व्यक्त झाली आहे. त्यांच्या अभंगात माणसाचे षढरिपू नष्ट करून त्यांना आदर्श अशा नैतिकतेची शिकवण देऊन माणसाला माणूस बनविणारे विचार व्यक्त झाले आहेत.

समाजात ढोंगी सन्याशांची संख्या वाढलेली होती. अनेकजण भक्तीच्यानावाखाली भोंदूगिरी करीत होती हे पाहून ते सद्‌गदित होतात. त्यांच्या भक्तीला डोळसपणा व विवेकवादांची जोड होती. त्यामुळे त्यांचे भक्तीविचार मानवी कल्याणाचे होते, परंतु समाजात खोट्या भक्तांची

संख्या दिवसेंदिवस वाढत होती. भक्तीपासून लोक खूप दूर होते. वैराग्य धारण केलेल्या या भक्तीमार्गाचा अवलंब केलेल्या अनेक व्यक्ती या आदर्श भक्तीविचाराच्या विरोधी वर्तन करीत होत्या. त्यामुळे मानवाचे धार्मिक व अध्यात्मिक जीवन संपुष्टात आले होते. भक्तीच्या नावावर अनेक अपप्रवृत्ती खपवल्या जात होत्या. संत तुकाराम हे आदर्श भक्त व प्रगतीशील संत होते. म्हणून त्यांना हे असहय झाले या अस्वस्थतेतूनच त्यांनी या सामाजिक दंभावर व ढोंगावर आपल्या अभंगातून सडेतोड विचार मांडले.

दावूनी वैराग्याची कळा |
भोगी विषयाचा सोहळा ||

अशा या उपहासात्मक शब्दांमध्ये अनैतिकतेने वागणाऱ्या ढोंगी सन्याशांची त्यांनी खरडपट्टी केली होती. समाजातील ढोंग, अभक्त ब्राम्हण, व्यसनात बुडालेले गोसावी यांच्यावर कडाडून हल्ला चढवून समाजामध्ये नैतिकता निर्माण करणे व समाज प्रगतशील हाच त्यांच्या कार्याचा व साहित्याचाही मुख्य उद्देश असलेला दिसतो. सामाजिक भोंदूगीरी, पोकळ पांडित्य, आळशीपणा, ऐतखाऊपणा आणि देवाच्या नावावर समाजाला फसविण्याची तत्कालीन सामाजिक विकृती संत तुकारामांनी आपल्या अभंगाच्या माध्यमातून समाजासमोर मांडली व समाज प्रगत करण्यासाठी आजन्म कार्य केले. त्यांच्या अभंगातून त्यांनी शरीरसुखापेक्षा त्याग व नैतिकतेला कर्मकांडापेक्षा चित्तशुध्दीला महत्त्व देऊन सर्वोच्च अशा जीवनमूल्यांचा परिचय समाजातील तळागाळातील लोकांना दिला. त्यांच्या अभंगात केवळ डोळस अध्यात्मिकताच नाही तर सामाजिक सास्कृतिक, वैज्ञानिक, मानसशास्त्रीय ऐतिहासिक आणि वैचारिक अधिष्ठान आहे. अमानुषतेने व अवगुणाने वागून आयुष्य उद्ध्वस्त करून घेणाऱ्या माणसांना संतांनी उपदेशातून शुध्द आचरणाची शिकवण दिली.

आता तरी पुढे हाचि उपदेश ।
नका करू नाश आयुष्याचा ॥
सकळांच्या पाया माझे दंडवत ।
अपापुले चित्त शुध्द करा ॥

सामाजिक उपदेश करताना त्यांनी स्वीकारलेला हा विनय त्यांच्या प्रगतीशील अशा उपदेशांला आपुलकीची व जिव्हाळ्याची उंची प्राप्त करून देतो. मानवी जीवनाला अधोगतीला नेणारा आळस हा माणसाचा शत्रू असून समाजात अशा आळशी माणसांची संख्या वाढली होती. म्हणून त्यांनी माणसाच्या प्रयत्नवादाचा विचार समाजासमोर ठेवला.

तुकारामातील संतानी त्यांच्यातील कवीला व्यापक अर्थाने खराखुरा कवी बनवीले होते. ज्या भागवत धर्माचा ज्ञानेश्वरांनी पाया रचला त्यावे कळस रचन्याचे भाग्य तुकारामांनी त्यामूळेच संत बहिणाभाई म्हणतात.

संत कृपा झाली इमारत फळाल आली ||
ज्ञानदेव रचिला पाया उभारिले देवालय ||
नामा तयाचा किंकर तेने केला हा विस्तार ||
जनार्दन एकनाथ खांब दिला भागवत् ||
तुका झालासे कळस भजन करा सावकाश ||

संत तुकोबारांयानी आपल्या अभंगातून भक्ती, ज्ञान, वैराग्य धर्म, नीती व्यवहार, सामाजिक गुण- दोष इत्यादी महत्त्वाच्या मूल्यांचे प्रबोधन केले तेही सुलभतेने समाजासमोर मांडल आहे. म्हणून आजच्या विक्राळ कलीच्या कालचक्रत परिभ्रमण करणाऱ्या या जगात जी मानवता एकता अखंडता सेवानिष्ठता सर्वधर्मपरायणात दिसून येते ती या संत वाड्:मयाच्या प्रभावामुळे होय त्या संत वाङ्मयात स्वतेजाने सर्वाचे डोळे दिपविणारा देदिप्यमान तेजोमय हिरा म्हणजेच श्री संत तुकोबारायाची अभंगगाथा होय.

**संदर्भ सूची**

१) डॉ. शरदचंद्र देगलूरकर - संत साहित्याचा सामाजिक अन्वयार्थ,
२) प्रा. रा. ग. जाधव- वाड्:मयीन आकलन
३) ल. रा. नासिराबादकर- प्राचीन मराठी वाड्:मयाचा इतिहास
४) प्रा. गं. बा. सरदार - संत वाड्मयाची सामाजिक फलश्रुती
५) डॉ. महादेव लहाने - संत तुकारामावर बौद्ध धर्माचा प्रभाव
६) डॉ.अमोल पालकर (संपा) - हिंदी एवं मराठी प्रगतिशिल कविता (स्मरणिका
७) डॉ रणजित जाधव (संपा) - हिंदी- मराठी संत साहित्य में प्रगतिशील चेतना